

सत्यमेव जयते


**अण्णाभाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्था (आर्टी), मुंबई**

(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)

बी-२०१/२०२ अर्जुन सेंटर, स्टेशन रोड, गोवंडी (पु) मुंबई- ४०० ०८८

समता न्याय एकात्मता

रजि नं.४३७६०३ Email Id- esta.arti@gmail.com website https://arti.org.in फोन नं. ०२२ - ४४५१५८५४/२५५००१९४/२५५००१९५


जा.क्र/आर्टी/CET//प्रवेशपत्र/ ०१९३ दि-२९/०९/२०२५

**महाराष्ट्र शासनाच्या सर्वकष धोरणानुसार सन २०२५-२६ करिता बार्टी, टीआरटीआय, सारथी, महाज्योती व आर्टी या संस्थामार्फत राबविण्यात येणाऱ्या स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम अंतर्गत घेण्यात येणाऱ्या संघ लोकसेवा आयोग नागरी सेवा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम – सामयिक प्रवेश परीक्षा (Common Entrance Test) संदर्भात**

## महत्वाची सूचना

सन २०२५-२६ करिता महाराष्ट्र राज्यातील बार्टी, टीआरटीआय, सारथी, महाज्योती व आर्टी या संस्थांमधून स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रमासाठी नामवंत खाजगी संस्थांमधून प्रशिक्षण देण्यासंदर्भातील योजनेच्या लाभासाठी प्रशिक्षणार्थी निवड करण्यासाठी बार्टी, पुणे मार्फत सामायिक प्रवेश परीक्षा (Common Entrance Test-CET) घेण्यात येत आहे.

दिनांक १७/०९/२०२५ रोजी प्रसिद्ध केलेल्या घोषणापत्रकानुसार **संघ लोकसेवा आयोग नागरी सेवा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम सामायिक प्रवेश परीक्षा (Common Entrance Test) सोमवार दिनांक २९/०९/२०२५ रोजी व मंगळवार दिनांक ३०/०९/२०२५ रोजी आयोजित करण्यात आलेल्या आहेत.**

महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाच्या दिनांक २६ सप्टेंबर २०२५ च्या प्रेस नोट नुसार मध्य महाराष्ट्र, कोकण व विदर्भ या भागामध्ये भारतीय हवामान विभागाकडून झालेल्या पूर्व अनुमानानुसार (IMD) मुसळधार पावसाची शक्यता वर्तवली असून अनेक जिल्ह्यांना ऑरेंज व रेड अलर्ट देण्यात आलेले आहेत. या पार्श्वभूमीवर दिनांक २९ व ३० सप्टेंबर २०२५ रोजी बार्टी, टीआरटीआय, सारथी, महाज्योती व आर्टी या संस्थांकरिता बार्टीमार्फत घेण्यात येणारी संघ लोकसेवा आयोग नागरी सेवा पूर्व प्रशिक्षण सामायिक चाचणी परीक्षा **(Common Entrance Test)** नियोजित वेळापत्रकानुसारच होईल परंतु पूरसदृश्य परिस्थितीमुळे जे विद्यार्थी सदर परीक्षेस उपस्थित राहू शकणार नाहीत त्या विद्यार्थ्यांसाठी संघ लोकसेवा आयोग नागरी सेवा पूर्व परीक्षा प्रशिक्षण सामायिक चाळणी परीक्षा **(Common Entrance Test)** पुन्हा घेण्यात येईल. संघ लोकसेवा आयोग नागरी सेवा पूर्व परीक्षा प्रशिक्षण सामायिक चाळणी परीक्षेस अनुपस्थित राहणाऱ्या विद्यार्थ्यांबाबत सामायिक चाळणी परीक्षेचे वेळापत्रक बार्टी संकेतस्थळावर जाहीर करण्यात येईल.

स्वाक्षरी/-

(सुनील वारे)

**व्यवस्थापकीय संचालक**

**अण्णा भाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्था**

**(आर्टी),मुंबई**